महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी

क्रमांक- मग्रारोहयो-1/ओम्बडसमन/2023

कार्यालयीन पत्ता - जिल्हाधिकारी कार्यालय, जयस्तंभ, रत्नागिरी

दिनांक - 08/08/2023

## पाहिजेत

## तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsperson)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना सर्व साधारण जनतेकडून प्राप्त होण तक्रारींचा निपटारा करणे व योजनेच्या कामात पारदर्शकता राखण्याकरीता उपाययोजना, सुचविणे यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनि 1977 च्या (6 ऑगस्ट, 2014 पर्यंत सुधारित) अनुसूची - 2 मधील कलम 29 नुसार रत्नागिरी जिल्हयाकरीता तक्रार निवारण प्राधि (Ombudsperson) यांची नेमणूक करावयाची आहे.

**किमान पात्रता :-**

- उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. उमेदवारास लोकप्रशासन/विधी/सामाजिक कार्य/शैक्षणिक किंवा व्यवस्थापन क्षेत्रा किमान वीस वर्षाचा अनुभव असावा. उमेदवार संबंधित जिल्हयातील रहिवासी असावा.
- उमेदवाराचे वय दि. 1/08/2023 रोजी 66 वर्षापेक्षा जास्त नसावे.
- उमेदवार राजकीय पक्षाशी संबंधित नसावा.
- उमेदवार शारिरिकदृष्टया सुदृढ तसेच जिल्हयातील अती दुर्गम भागात दौरे, निरीक्षण करण्यास सक्षम असावा.

**कालावधी व मानधन**

- या पदावरील नियुक्तीचा कार्यकाल दोन वर्षाकरीता असेल तथापि, कामगिरी समाधानकारक नसल्यास नियुक्ती रदद करण येईल.
- त्यांचे कार्यालय संबंधित जिल्हयाचे मुख्यालयाच्या ठिकाणी असेल.
- तक्रार निवारण प्राधिकारी यांना प्रती बैठक रु.1000/- या दराने (कमाल रु. 20,000/- प्रती माह या मर्यादेत) मानधन देण येईल.
- तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsperson) या पदाची तपशीलवार माहिती, नियुक्तीच्या अटी/शर्ती व अर्जाचा नमुना, शासनाच्या दि. 16/01/2014 रोजीच्या मार्गदर्शक सूचनांदवारे निश्चित करण्यात आला असून त्याची प्रत केंद्र शासना www.nrega.nic.in या संकेतस्थळावर तसेच उपजिल्हाधिकारी (रोहयो), रत्नागिरी जिल्हा यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

इच्छुक उमेदवारांनी स्वतःची शैक्षणिक पात्रता,अनुभव, वय इ.चे दाखले त्याचप्रमाणे fitness बाबत वैदयकिय दाख राजकीय पक्षाचा सदस्य नसल्याचे व कोणताही गुन्हा नोंद नसल्याचे नोटरी केलले प्रतिज्ञापत्र इ.सह जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्य समन्वयक यांच्या नावाने अर्ज तयार करावा व सदर अर्ज उपजिल्हाधिकारी (रोहयो), रत्नागिरी यांचे कार्यालयात **दिनांक 17 ऑगस्ट, 2 सायं. 6.00 वाजे पर्यंत** सादर करावा. उशिराने प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. उपजिल्हाधिकारी (रोहयो) कार्यालयात होणा-या अर्जाची छाननी करण्यात येईल व छाननी अंती प्राप्त झालेल्या अर्जाची नामांकने मुळ कागदपत्रांसह खालील तक्त्यात केल्याप्रमाणे शासनास सादर करण्यात येतील.

| अ.क्र. | विहित नमुन्यात अर्ज | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी कार्यालयाने अर्जाची प्राथमिक छाननी करण्याचा दिनांक | दिनांक 22 ऑगस्ट, 2023 |
| 2 | जिल्हाधिकारी यांनी पात्र उमेदवारांची नामांकने शासनाकडे सादर करण्याचा दिनांक | दिनांक 25 ऑगस्ट, 2023 |

या प्रक्रियेकरीता प्राप्त होणा-या अर्जांपैकी कोणतेही कारण न देता विशिष्ट अर्ज किंवा सर्व अर्ज रदद करण्याचे अधि राखून ठेवण्यात येत आहेत.

(एम. देवेंदर सिंह)

जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना रत्नागिरी

mahabharti.in